॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## Office of the Director-Board of Examinations & Evaluation

Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: srtmuncoe@gmail.com
srtmundboee@gmail.com

जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०२०—२१/५५१ दिनांक : २८/१०/२०२०

**::परिपत्रक::**

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर, परभणी,
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
समन्वयक,कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास आणि संशोधन केंद्र, किनवट.

**विषय : उन्हाळी २०२० परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र न भरलेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गामध्ये तात्पुरता प्रवेश देणेबाबत. (विधी अभ्यासक्रम वगळून)**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, दि. २५/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील शिफारशीनुसार व दि. २९/०९/२०२० रोजी संपन्न झालेल्या विद्या परिषदेच्या ४९ व्या बैठकीतील ऐनवेळेचा विषय क्रमांक ११/४९—२०२० नुसार ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र सादर/भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षात तात्पुरता प्रवेश देवून शैक्षणिक वर्ष पूर्ण करण्याची परवानगी देण्यात यावी असे ठरले.

वरील ठरावानुसार पदवी स्तरावरील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षामध्ये, व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना तृतीय वर्षामध्ये, चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रथम ते व्दितीय, व्दितीय ते तृतीय व तृतीय ते चतुर्थ वर्षामध्ये तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षामध्ये तात्पुरता प्रवेश देवुन शैक्षणिक वर्ष पुर्ण करण्याची परवानगी देण्यात येते.

***सबब, वरील ठरावानुसार ज्या विद्यार्थ्यांनी तात्पुरता प्रवेश घेतलेला आहे त्यांना मागील वर्षातील पुर्ण विषय आगामी हिवाळी—२०२० परीक्षेमध्ये उत्तीर्ण केल्यानंतरच पुढील वर्गाची/वर्षाची परीक्षा देण्यासाठी पात्र झाल्यानंतरच त्यांना पुढील वर्गाची/वर्षाच्या परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येईल. सदर निर्णय हा कोवीड—१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थीतीमुळे घेण्यात आला असुन केवळ याच शैक्षणिक वर्ष २०२०—२१ करीता लागु राहील.***

वरील प्रमाणे तात्पुरत्या प्रवेशासाठी ठराव हा बारकौन्सील ऑफ इंडियाचे दि. ०९/०६/२०२० रोजीच्या पत्रानुसार **विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना लागू नाही.** सबब, या परिपत्रकाची नोंद घेवुन हि बाब सर्व संबधीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावी.

आपला,

**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव सादर :**
मा. कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र—कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. सहयोगी अधिष्ठाता, मानव्यविज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.